## संक्षिप्त वृत्त



### चोरीला गेलेले ४४ मोबाईल पोलिसांनी केले हस्तगत

**सोलापूर** : शहरातील वेगवेगळ्या ठिकाणाहून चोरीला गेलेले ४४ मोबाईल सदर बझार पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकानी हस्तगत केले असल्याची माहिती पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. शहरातील हॉस्पिटल, दुकानातून तसेच वेगवेगळ्या ठिकाणाहून मोबाईल घेऊन पळून गेलेले असे ६ लाख ६० हजार रुपये किमतीचे ४४ मोबाईल वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजित लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार इनामदार व गुन्हे शोध पथकाने हस्तगत केले आहेत. यातील मोबाईल फोन पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांच्या हस्ते मूळ मालकांना परत देण्यात आले. पोलिस उपायुक्त श्रीयुत कबाडे यांनी विशेष कामगिरी करणाऱ्या या पथकाचे कौतुक केले आहे.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

**सोलापूर** : फिर्यादीचे राहते घरातून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस फूस लावून व तिला कशाचे तरी आमिष दाखवून तिचे अपहरण करण्यात आले. या प्रकरणी अरबाज दस्तगीर बेग (रा. जेवळी ता. उमरगा जि. धाराशिव) याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी त्या मुलीच्या वडिलांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, दि. २४ जानेवारी २०२४ रोजी १० वाजण्याच्या सुमारास यातील फिर्यादीची १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस अरबाज बेग याने राहते घरातून कशाचे तरी आमिष दाखवून व तिला फूस लावून तिचे अपहरण केले. या फिर्यादीवरून आरोपी अरबाज दस्तगीर बेग याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा तपास हवालदार चव्हाण हे करित आहेत.

### मागील भांडणाचा राग मनात धरून विद्यार्थ्यांना मारहाण

**सोलापूर** : ट्युशनकरिता गेलेल्या विद्यार्थ्यांला ट्युशन सुटल्यानंतर मागील भांडणाच्या कारणावरून तिघांनी मिळून जबर मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली आहे. हा प्रकार लॉजिक इन्स्टिटयूट वीरशैव नगर विजापूर रोड सोलापूर येथे १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता घडला आहे. याप्रकरणी सुभाष शिवलिंग कटगेरी यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत राहुल राठोड,सचिन जवळगी, निर्दव या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक पोपळभट करीत आहेत.

### घरगुती वादातून पत्नीचा आत्महत्याचा प्रयत्न

**सोलापूर** : पतिसोबत घरगुती कारणावरून झालेल्या वादामुळे पत्नीने शेणात टाकायचे पिवळ्या रंगाचे औषध पिऊन आत्महत्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. कविता महादेव धायगुडे (वय ३४ रा. नितीन नगर,मल्लिकार्जुन नगर जवळ सोलापूर) असे महिलेचे नाव आहे.पती महादेव धायगुडे यांनी पत्नी कविता धायगुडे हिला औषध पिल्यामुळे त्रास होत असल्यामुळे. सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी शुक्रवारी दिनांक २४ फेब्रुवारी रोजी दाखल केले आहे.पेशंट शुद्धीवर असून सिव्हिल हॉस्पिटल मधून पळून गेली आहे याबाबत सिव्हिल चौकीत नोंद करण्यात आली.

## लोकमंगल समृद्ध ग्राम अभियानाची सुरुवात

**सोलापूर** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्ह्यातल्या विविध गावांमध्ये लोकमंगल समृद्धग्राम योजनेखाली अनेक प्रकारच्या सामाजिक उपक्रमांची सुरुवात झाली. अनेक गावात विशेषतः तरुणांच्या लोकोपयोगी कामे केली.

काही गावात गावकऱ्यांनी वृक्षारोपण करून तर काही गावातल्या तरुणांनी रक्तदान करून आ. सुभाष देशमुख यांच्या उपस्थितीत समृद्धग्राम अभियानात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. विशेष म्हणजे काही गावांमध्ये लोकांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी आर ओ प्लांट बसवण्यात आले. आ. देशमुख यांनी या सर्व गावातील गावकऱ्यांशी संवाद साधताना गावाचा विकास करण्यासाठी एक दिलाने आणि संघटितपणे काम करण्याची प्रतिज्ञा करण्याचे आवाहन केले.सोलापूर जिल्ह्यातल्या अनेक गावांमध्ये लोकमंगलतर्फे समृद्धग्राम अभियान राबविण्यात येणार असून गावातील लोकांच्या पुढाकाराने आणि परस्पर सहकार्याने त्या दृष्टीने विविध योजना तयार करण्यात येत आहेत. समृद्धग्राम अभियानाची संकल्पना लोकांना पसंत पडली असून तिला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन विविध गावातील नागरिकांनी दिले आहे. यावेळी काही गावांमधून स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. काही गावात गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. उत्साहाने शिवजयंती साजरी करणाऱ्या शिवमंडळांचा सन्मान करण्यात आला. या सर्व कार्यक्रमांना त्या त्या गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे सदस्य तसेच बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.




योजनेमध्ये अधिकाधिक गावांना समाविष्ट करून घेण्यात येणार आहे.ज्या गावातील नागरिकांना या अभियानात सहभागी होऊन आपल्या गावाचा विकास घडवायचा आहे त्यांनी लोकमंगलच्या नजीकच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

### लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर

# दोन गुन्हेगार तीन जिल्ह्यांमधून तडीपार

## दोन्ही गुन्हेगार तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील

सुराज्य/सोलापूर

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार नंदु उर्फ नंदकुमार लक्ष्मण चव्हाण उर्फ राजपूत (रा. हिरज ता. उत्तर सोलापूर) व महेश उर्फ बबलू सुभाष पोळ (रा. हगलुर ता. उत्तर सोलापूर) या दोघांना सोलापूर, सांगली व धाराशीव या तीन जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे.**

आगामी लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सराईत गुन्हेगार नंदु उर्फ नंदकुमार लक्ष्मण चव्हाण उर्फ राजपूत (रा. हिरज ता. उत्तर सोलापूर) याच्या विरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम ५६ अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव




तालुका पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी पोलीस अधिक्षकांकरवी उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर यांच्याकडे सादर केला होता. नंदकुमार चव्हाण याच्याविरूध्द तालुका पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, मारामारी करून गंभीर दुखापत करणे, अवैधरित्या दारूची विक्री करणे अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

तसेच दुसरा सराईत गुन्हेगार महेश उर्फ बबलू सुभाष पोळ (रा. हगलुर ता. उत्तर सोलापूर) याच्याविरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम ५६ अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव तालुका पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी पोलीस अधिक्षकांकरवी उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर यांच्याकडे सादर केला होता. महेश पोळ याच्याविरूध्द तालुका पोलीस ठाण्यात मारहाण करणे, महिला विषयक, जबरी चोरी व अनुसूचित जाती जमाती अत्याचार कायद्यान्वये असे एकूण ७ गुन्हे दाखल आहेत.यावरून नंदु चव्हाण व महेश पोळ या दोघांना दि. ३१ मे २०२४ पर्यंत सोलापूर, सांगली व धाराशीव या तीन जिल्ह्यांमधून तडीपार करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तानुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांच्या नेर्तृत्वाखाली तत्कालीन फौजदार सुरज निंबाळकर, हवालदार मियाँवाले, पैगंबर नदाफ तसेच हिरज बीट मधील कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी पार पाडली.



### आदर्श ग्रामसेवक, सुंदर गाव,

## महाआवास अभियान पुरस्काराचे वितरण

**सोलापूर** : जिल्हा परिषदेच्या वतीने आर. आर (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार, अमृत महोत्सव अभियान पुरस्कार, व आदर्श ग्रामसेवक पुरस्काराचे वितरण पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते मोठ्या झाले.

कार्यक्रम पंढरपूर शहरातील श्री यश पॅलेस येथे झाला. व्यासपीठावर आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकांदे, प्रकल्प संचालक अमोल जाधव, प्रणव परिचारक, पवन महाडिक, ओएसडी बाळासाहेब यादव यांची उपस्थिती होती. पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, मी बाराशे लोकसंख्येच्या गावात राहणारा नागरिक आहे, छोट्या गावाशी जोडला असल्याने, तिथले प्रश्न विकासाचे मुद्दे मला माहिती आहेत, असेही पालकमंत्री पाटील म्हणाले.

# ...आज जरी उपोषण सोडलं तरी पुन्हा बसेन

### सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मराठा आंदोलकाने सोडले उपोषण

सुराज्य/सोलापूर

मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ आणि मराठा आरक्षणासाठी गेल्या सात दिवसापासून बेमुदत उपोषणासाठी बसलेले दीपक पवार यांनी गुरुवार दि. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी उपोषण सोडले. मात्र गरज पडल्यास पुन्हा उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे.

सांगोला तालुक्यातील कडलास या ठिकाणचे मराठा आंदोलक दीपक पवार हे गेल्या सात दिवसापासून बेमुदत उपोषणासाठी बसले होते.



उपोषणामुळे प्रकृती ढासळल्याने त्यांना उपचारासाठी सोलापुरातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळताच सकल मराठा समाजाचे नेते माऊली पवार तातडीने हॉस्पिटल येथे गेले. दीपक पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस करून मनोज जरांगे पाटील यांच्या सूचनेनुसार उपोषण मागे घ्यावी अशी विनंती केली. यामुळे दीपक पवार यांनी आमरण उपोषण सोडत असल्याचे सांगितले. तसेच माऊली पवार यांच्या हस्ते लिंबू सरबत घेऊन गरज पडल्यास पुन्हा उपोषण करेल असा इशारा दिला. यावेळी सिव्हिलमध्ये पवार यांचे बंधू सुनील पवार, शिवाजी चापले, डॉ. सुनिता गायकवाड आणि इतर उपस्थित होते.


**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**(विद्युत विभाग)**
**-: जाहीर प्रसिध्दीकरण :-**
Tender ID :-2024_SMC_1004647_1.
**ई निविदा सुचना २०२३-२०२४.**
**प्रथम मुदतवाढ**

अक्कलकोट रोड येथील सार्वजनिक हिंदु स्मशानभुमी येथील गॅसदाहिनी, पद्मशाली स्मशानभुमी येथील गॅस दाहिनी, कारंबा नाका गॅस दाहिनी, देगांव येथील गॅस दाहिनी, कुमठे येथील गॅस दाहिनी करीता एलपीजी गॅस सिलेंडर आवश्यकतेप्रमाणे पुरवठा करणे. (19 KG. एलपीजी गॅस सिलेंडर पुरवठा) करिता एलपीजी गॅस सिलेंडर उत्पादित कंपनीकडुन / अधिकृत विक्रेते यांचेकडुन ई निविदा मागविण्यात येत आहे. Tender ID :-2023_SMC_876790_1 ने मागविण्यात आलेल्या ई निविदा प्रक्रियेस दि. २३/०२/२०२४ ते दि. २९/०२/२०२४. पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सही/-
अति. आयुक्त-१
सोलापूर महानगरपालिका



**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई निविदा सुचना क्र. ३१/२०२३-२४**

महावितरण तसेच शासन ई-नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदाराकडुन कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत सोलापूर सं व सु मंडल कार्यक्षेत्रातील विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र | कामाचे स्वरुप | निविदा रक्कम रुपये |
|---|---|---|
| टी-१८०/२०२३-२४ | सं.व सु.ग्रामिण व शहर विभाग सोलापूर, जि. सोलापूर अंतर्गत दैनंदीन कुपनलिका दुरूस्ती ची कामे करणे. (कालावधी ८ महिने) | रु. ९.९९ लाख |
| टी-१८१/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र अक्कलकोट शहर विभाग, जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रु. ८.९५ लाख |
| टी-१८२/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र नरखेड, जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रु. ९.९९ लाख |
| टी-१८३/२०२३-२४ | मोहोळ उपविभाग जि. सोलापूर येथील कार्यालय व नियंत्रण कक्षाचे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे.(कालावधी ३ महिने) | रु. ५.६२ लाख |
| टी-१८४/२०२३-२४ | सोलापूर मंडळ परिसर जि. सोलापूर येथील कार्यालय व रहिवासी ईमरतीचे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ८ महिने) | रु. ९.८७ लाख |
| टी-१८५/२०२३-२४ | सोलापूर ग्रामिण विभाग जि.सोलापूर अंतर्गत विविध स्थापत्य दुरूस्तीची दैनंदीन कामे करणे. (कालावधी ८ महिने) | रु. ९.९४ लाख |
| टी-१८६/२०२३-२४ | सोलापूर शहर विभाग जि. सोलापूर विविध स्थापत्य दुरूस्तीची दैनंदीन कामे करणे. (कालावधी ८ महिने) | रु. ९.८७ लाख |
| टी-१८७/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र भाळवणी, ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ९.२१ लाख |
| टी-१८८/२०२३-२४ | पंढरपूर शहर उपविभाग व पंढरपूर ग्रामिण-२ उपविभाग ता.पंढरपूर जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. १०.०० लाख |
| टी-१८९/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र बुध्दीहळ ता.सांगोला जि.सोलापूर येथे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ८.७० लाख |
| टी-१९०/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र अचकदाणी ता.सांगोला जि. सोलापूर येथे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ९.४३ लाख |
| टी-१९१/२०२३-२४ | ३३ के.व्ही. उपकेंद्र सलगर (वु.), ता. मंगळवेढा जि. सोलापूर येथे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ९.७३ लाख |
| टी-१९२/२०२३-२४ | सं.व सु. विभागीय कार्यालय पंढरपूर येथील स्थापत्य नुतनीकरणाची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ८.९० लाख |
| टी-१९३/२०२३-२४ | सं.व सु. पंढरपूर विभाग, जि. सोलापूर अंतर्गत कुपनलिकाची दैनंदीन दुरूस्ती ची कामे करणे. (कालावधी ६ महिने) | रु. ९.९९ लाख |
| टी-१९४/२०२३-२४ | सांगोला ग्रामिण ०१ शाखा कार्यालय विज बिल भरणाकेंद्र व सांगोला उपविभागाची स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे (कालावधी २ महिने) | रु. ९.९९ लाख |
| टी-१९५/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र मानेगाव, जि. सोलापूर येथे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ९.९९ लाख |
| टी-१९६/२०२३-२४ | सं.व सु. बार्शी विभाग जि. सोलापूर अंतर्गत दैनंदीन कुपनलिका दुरूस्ती ची कामे करणे. (कालावधी ६ महिने) | रु. ९.९९ लाख |
| टी-१९७/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र दारफळ सिना, जि. सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ९.०० लाख |
| टी-१९८/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र सालमुख, जि. सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ८.३४ लाख |
| टी-१९९/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र बाभूळगाव, ता. पंढरपूर जि. सोलापूर येथे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ९.२४ लाख |
| टी-२००/२०२३-२४ | ३३/११ के.व्ही. उपकेंद्र घेरडी, ता. सांगोला जि. सोलापूर येथे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी २ महिने) | रु. ९.११ लाख |
| टी-२०१/२०२३-२४ | माढा, कुर्डूवाडी, बार्शी ग्रामिण आणि बार्शी शहर सं व सु उपविभाग, जि. सोलापूर अंतर्गत दैनंदीन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ६ महिने) | रु. ९.९५ लाख |
| टी-२०२/२०२३-२४ | टेभुर्णी, करमाळा, जेऊर सं व सू उपविभाग जि. सोलापूर अंतर्गत दैनंदीन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ६ महिने) | रु. ९.९५ लाख |
| टी-२०३/२०२३-२४ | सं.व सु. पंढरपूर विभाग व सं व सू अकलूज विभाग , जि. सोलापूर अंतर्गत दैनंदीन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ६ महिने) | रु. १०.०० लाख |
| टी-२०४/२०२३-२४ | सोलापूर ओ.एम.सी परिसर येथील विश्रामगृह येथे फर्निचर पुरवणे. (कालावधी ०२ महिने) | रु. ०९.२७ लाख |

ई- निविदा विक्रीचा कालावधी दि. २३ फेब्रुवारी २०२४ ते दि. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून ई-निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत आहे. ई-निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क : कार्यकारी अभियंता (स्था), बारामती. मो.७८७५७६८५५५. निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितानी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे. मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरी दारानी राखुन ठेवलेले आहेत.

**कार्यकारी अभियंता (स्था)**
**स्थापत्य विभाग, बारामती**

PRO/BMTZ/212/2023-24



**उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी**
**ता. माढा जि.सोलापूर**

Email ID-sdomadha@gmail.com — Ph No. 02183/223261

क्रं. भूसंपादन/एस आर/०५/२०२४ — दिनांक १२/०२/२०२४

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापन विभाग भीमानगर यांचेकडील सीना माढा उपसा सिंचन योजना अंतर्गत डावा कालवा वितरीका क्रं. १ ची लघुवितरीका क्रं.२ उजवी, करिता मौजे लउळ ता. माढा जि. सोलापूर येथील जमीनी (सोबत अनुसूचीप्रमाणे) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, मंत्रालय मुंबई दि. १२ मे २०१५ व क्र.संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ-२ दि.३० सप्टेंबर २०१५ प्रमाणे व शासन परिपत्रक क्र.एलक्युएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दि. २५ जानेवारी २०१७ मध्ये खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेबाबत विषद केलल्या कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणे प्रस्तावित आहे.

सदर बाबत जमीनीतील हक्क, हितसंबंध हरकत असल्यास वा जमिनीच्या अनुषंगाने म्हणणे मांडावयाचे असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत पुराव्यानिशी लेखी तक्रार समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.३० ते सायं. ५.४५ वाजेपर्यंत) पोहचेल अशारितीने उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी या कार्यालयाकडे लेखी म्हणणे / हरकत सादर करावी. अन्यथा खालील अनुसूचित स्तंभ ३ मध्ये नमूद जमीन स्तंभ २ मध्ये नमूद जमीन मालकीची निर्वेध व निजोखीम मिळकत असल्याचे समजण्यात येईल. दिलेल्या मुदतीनंतर कोणतीही हरकत आल्यास ती या कार्यालयास कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही.

सोबत : अनुसूची
**दि.१२/०२/२०२४**
**स्थळ - कुर्डुवाडी**

सही/-
**(प्रियांका आंबेकर)**
**उपविभागीय अधिकारी**
**माढा विभाग, कुर्डुवाडी**

**संपादक संस्थेचे नांव :- कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग भीमानगर**
**भूसंपादनाचे प्रयोजन :- सीना माढा उपसा सिंचन योजना अंतर्गत डावा कालवा वितरीका क्रं. १ ची लघुवितरीका क्रं. २ उजवी, करिता मौजे लऊळ, ता. माढा, एस आर क्रं. ०५/२०२४**

| अ.क्र. | भूधारकांचे नांव | गट नंबर | भूधारणा पध्दती | गांव नमुना नं. ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सागर चंद्रकांत गायकवाड, वर्षा अशोक काटे, कवीता राजेंद्र काळे, गंगा धनंजय भांगे, लक्ष्मी चंद्रकांत गायकवाड | ९७ | भोगवटदार वर्ग १ | ४.४५ | ०.८८ |
| | शीला मोहन कदम, शितल मोहन कंदम, राजेश मोहन कदम | | भोगवटदार वर्ग १ | २.४१ | |
| | वामन निवृत्ती गोडसे, महादेव सोपान गोडसे, रामचंद्र सोपान गोडसे, विकास तानाजी गाडे | | भोगवटदार वर्ग १ | ३.२२ | |
| | आमीर नशीर मुलाणी, समीर काशीम मुलाणी | | भोगवटदार वर्ग १ | ०.८१ | |
| | वामन निवृत्ती गोडसे, स्नेहा अमोल गोडसे, अमोल कुंडलिक गोडसे, समाधान कुंडलिक गोडसे, मंगल कुंडलिक गोडसे | | भोगवटदार वर्ग १ | १.२७ | |
| | भारम किसन उरमोडे, अमोल कुंडलिक गोडसे, घेरवचंद राजमल बाटिया, हनुमंत ज्ञानदेव गोडसे, प्रशांत हनुमंत गोडसे, सोमनाथ हनुमंत गोडसे | | भोगवटदार वर्ग १ | ४.४८ | |
| २ | रमेश नारायण भोंग | ९८ | भोगवटदार वर्ग १ | २.२० | ०.२६ |
| | मदन नवनाथ देवकर, ज्ञानेश्वर नवनाथ देवकर, कौशल्या नामदेव मोहिते, शारदा अरूण देवकर | | भोगवटदार वर्ग १ | ३.६० | |
| | विमल पांडुरंग देवकर, अपाक आई विमल देवकर, जयश्री पांडुरंग देवकर, दिनेश पांडूरंग देवकर, दिनेश पांडूरंग देवकर, माया पांडूरंग देवकर | | भोगवटदार वर्ग १ | १.८५ | |
| ३ | नामदेव आंदू राउत, परमेश्वर नामदेव राउत, ईश्वर नामदेव राउत | ९९ | भोगवटदार वर्ग १ | ४.६३ | ०.२३ |
| ४ | अविनाश उर्फ मारूती दिगंबर गावडे उर्फ मारूती | १०० | भोगवटदार वर्ग १ | २.४१ | ०.०४ |
| ५ | यश चंद्रकांत गावडे | १०२ | भोगवटदार वर्ग १ | १.५८ | ०.२१ |
| | रविंद्र सिध्देश्वर गावडे, अशोक सिध्देश्वर, गावडे, नारायण सिध्देश्वर गावडे, सत्यवान सिध्देश्वर गावडे, भारत सिध्देश्वर गावडे | | भोगवटदार वर्ग १ | १.५८ | |
| | मंदाकिनी विठ्ठल गावडे, सोपान विठ्ठल गावडे, दिपाली धनंजय नरखेडकर, सागर विठ्ठल गावडे, मदन विठ्ठल गावडे, तुकाराम मलकार्जुन गावडे, राजकुमार नामदेव गावडे, संजय नामदेव गावडे | | भोगवटदार वर्ग १ | २.०० | |
| ६ | दत्तात्रय दिगंबर गावडे, भाग्यश्री नारायण गावडे, मिनाक्षी अनिलकुमार गावडे | १०३ | भोगवटदार वर्ग १ | १.६५ | ०.१९ |
| ७ | जोतीराम काशिनाथ गाडे, पोपट कृष्णा गाडे | १३० | भोगवटदार वर्ग १ | १.६० | ०.१४ |
| | भास्कर देविदास गाडे, शिवराज विष्णू गाडे, रामचंद्र जालिंदर घूगे | | भोगवटदार वर्ग १ | १.०४ | |
| | राजेंद्र दिगंबर गाडे, दत्तु दिगंबर गाडे, रोहित दत्तू गाडे अपाक वैशाली दत्तू गाडे, वैशाली दत्तू गाडे | | भोगवटदार वर्ग १ | १.४८ | |
| | शंकर देविदास गाडे | | भोगवटदार वर्ग १ | १.१६ | |
| | निलेश अजिनाथ गाडे, बालाजी अजिनाथ गाडे | | भोगवटदार वर्ग १ | १.१५ | |
| ८ | उषा तानाजी गाडे, नितीन तानाजी गाडे, अमरदीप कल्याण डिकोळे, नितीन लक्ष्मण डिकोळे, मनोज लक्ष्मण डिकोळे | १३१ | भोगवटदार वर्ग १ | २.७५ | ०.२४ |
| | रामचंद्र संदीपान गाडे, सागर रामचंद्र गाडे, ज्ञानेश्वर रामचंद्र गाडे | | भोगवटदार वर्ग १ | १.४५ | |
| | कल्याण संदिपान गाडे | | भोगवटदार वर्ग १ | १.३० | |
| ९ | महानंदा आंबादास गाडे, पुजा आंबादास गाडे, किशोर आंबादास गाडे, सुजाता आंबादास गाडे, रोहन आंबादास गाडे, शोभा नवनाथ गाडे, विकास तानाजी गाडे | १३२ | भोगवटदार वर्ग १ | १.३६ | ०.२१ |
| १० | सतीश तुकाराम कदम | १३४ | भोगवटदार वर्ग १ | १.१८ | ०.१७ |
| | सतीश तुकाराम कदम | | भोगवटदार वर्ग १ | १.१७ | |
| | अलका भिमराव कापरे, पदमीनी आप्पाराव कापरे | | भोगवटदार वर्ग १ | २.३६ | |
| | नितीन मच्छिंद्र भोंग | | भोगवटदार वर्ग १ | २.३५ | |
| | | | | | २.५७ |

दिनांक : १२/०२/२०२४
स्थळ : कुर्डूवाडी

सही/-
(प्रियंका आंबेकर)
उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डूवाडी

**जिमाका/सो/जाहि/३९९/२०२३-२४**